जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/११/२०२३
## दि.२२/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ११८४/२०२३,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २३ वर्षे,रा.कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्यांचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/११/२०२३ रोजी २३/०० वा. शिवतिर्थ अपार्टमेंट इमारती समोर शिवनेरीनगर ग.नं.३० कोंढवा-खुर्दु,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे नातेवाईक यांचेसह जात असताना,यातील नमुद इसमांनी सदर ठिकाणी येवुन,फिर्यादी यांना शिवीगाळ व काठीने मारहाण करुन,त्यांना गंभीर दुखापत करून, फिर्यादी यांचे हाता मधील मोबाईल १५,०००/- रु. किचा जबरी चोरी करून घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अमित शेटे ७५८८०२४५१३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ८५६/२०२३,भादविक ३८६,३२३,५०४,३४ क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३२ वर्षे,रा.मांजरी,पुणे |
| **आरोपीत** | १.साहील सुनिल गोडांबे,वय-२१ वर्षे,रा.लिंक रोड,सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे २.योगेश लक्ष्मण जानकर,वय -२७ वर्षे,रा.जाधव चाळ,साईनाथ नगर,सोमेश्वरवाडी,पाषाण,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/११/२०२३ रोजी ०२/१५ वा. जाधव हाईट्स पाषाण,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कार मधुन जात असताना,त्यांना पत्ता माहित नसल्याने त्यांनी यातील नमुद इसमांना पत्ता विचारला असता,त्यांनी पत्ता न सांगता फिर्यादी यांचे कारमध्ये बसुन,त्यांची कार साईडला घेवुन बाजुला थांबण्यास सांगुन,आम्ही इथले भाई आहे असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ व मारहाण करुन,दारु पिण्यासाठी पैसे मागुन,त्यांना चाकुचा धाक दाखवुन,जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचेकडुन रोख ३,३००/- रुपये रोख रक्कम घेवुन,सदर परिसरात दहशत निमार्ण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सोनवणे ९८२२२९८४३२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ५८७/२०२३,भादविक ३०८,३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३० वर्षे,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपीत** | बांधकाम साईटवरील बांधकाम मालक,ठेकेदार व साईट इंजिनिअर्स तसेच इतर संबंधीत (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/११/२०२३ रोजी १४/४५ वा.ला कमर्शिअल बांधकाम साईट लगत,गणराज चौका जवळ बाणेर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद बांधकाम साईटवरील बांधकाम मालक,ठेकेदार व साईट इंजिनिअर्स तसेच इतर संबंधीत यांनी ठेकेदाराने त्याचे बांधकाम चालु असलेल्या साईटवर काम करीत असताना, इतर नागरीकांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांचा जीव जाईल याची जाणीव असताना,सुध्दा बांधकाम साईटवर जाळी (नेट) न लावता,सुरक्षिततेची योग्य ती काळजी न घेता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,फिर्यादी हया त्यांचा मुलगा,रुद्र केतन राऊत, वय-०९ वर्षे याचेसह शाळेतुन घरी पायी जात असताना,नमुद ठिकाणी ला कमर्शिअल बांधकाम साईटवरील बिल्डींगचेवरुन रूद्र यांचे मुलाचे डोक्यात लोखंडी सळईचा गट्टु पडुन,त्यामध्ये तो गंभीर जखमी होवुन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राजकुमार केंद्रे ८८८८९९३३९९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**